**मोटार अपघात दावा अर्ज १९५/२०२१**
**निशाणी क्र. ३९**

**अर्जदारातर्फे साक्षीदार नं. २ यांचा जबाब.**

**साक्षीदाराचे नाव - शरद भानुदास धामणे**

**वय - ४७ वर्ष**

**कामधंदा - नोकरी, वरीष्ठ लिपीक, एस. पी. ऑफीस , अहिल्यानगर**

**रहाणार - सारोळा कासार, ता. जि. अहिल्यानगर**

.................................................................................................................................

**साक्षीदाराचा सरतपास अर्जदारातर्फे श्री. व्ही. के. भोर्डेवकील यांचे मार्फत -**

०१. मी आज समन्स प्रमाणे पोलीस कॉन्स्टेबल संपत रतन एकशिंगे यांचे पगाराचा दाखला कोर्टात दाखल केलेले आहेत. मयत संपत यांची नेमणुक पोलीस कॉन्स्टेबल या पदावर दिनांक २८/०३/२००९ रोजी करण्यात आली होती. मृत्युच्या वेळी त्यांची नेमणुक शेवगाव पोलीस स्टेशनला करण्यात आली होती. त्यांना माहे जानेवारी २०२१ रोजी एकुण पगार ५२,७५८/- रूपये होता. त्यांना माहे फेब्रुवारी २०२१ रोजी एकुण पगार ४६,८५०/- रूपये होता. मार्च २०२१ मध्ये सुदधा त्यांचा पगार ४६,८५०/- होता. मला आता या तिनही महिन्याचे पगार दाखले दाखवले त्याच्यावरती डी. डी. ओ. श्री. गणेश माने यांच्या सहया आहेत त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. पगार दाखल्यांना एकत्रीत **निशाणी क्र. ४०** देण्यात येते.

०२. संपत यांचा सन २०२०-२०२१ सालचा फॉर्म नं. १६ मी आज रोजी दाखल केला आहे, त्याच्यावरीत डी. डी. ओ. यांची सही आहे, त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे, त्याला **निशाणी क्र. ४१** देण्यात येते.

सरतपास पुर्ण.

**गैरअर्जदार नं. १ व ३ तर्फे यांना व त्यांचे वकीलांना वारंवार पुकारले असता गैरहजर करीता त्याचेतर्फे उलटतपास नाही.**

**साक्षीदाराचा उलटतपास गैरअर्जदार नं. २ तर्फे श्री. ए. के. बंग वकील यांचे मार्फत -**

०२. माहे फेब्रुवारी २०२१ व मार्च २०२१ चे पगार पुर्णपणे ३० दिवसाप्रमाणे काढलेले आहेत. संपत यांच्या मृत्युनंतर त्यांच्या पत्नीस कार्यालयाकडुन पेंन्शन दिली जात नाही, परंतु त्यांना डी.सी.पी.एस. ची रक्कम देण्यात आली आहे. त्यांच्या पगारातुन प्रोफेशन टॅक्स वजा केला जात होता. हे म्हणणे खरे नाही की, संपत हा आमच्या डिपार्टमेंटमधील कर्मचारी असल्याने मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृती,

दिनांक : २३.०१.२०२६
अहमदनगर.

( सी. एम. बागल )
सदस्य, मोटार अपघात प्राधिकरण,
अहमदनगर